# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ११८ /२०२५ दि. १६ /०७/२०२५

**—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—**

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात **कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत MMRDA मार्फत मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. कंपनी कडून मुंबई मेट्रो ४ चे काम करण्यात येणार आहे. सदर मेट्रो ४ चे **नागलाबंदर सिग्नल ते इंडियन ऑईल पंप दरम्यान व नागलाबंदर ते भाईंदरपाडा दरम्यान दोन्ही वाहिनीवर वेगवेगळया दिवशी T & L precast, I & U Grider** चे काम दिनांक १६/०७/२०२५ ते दिनांक ०८/०८/२०२५ या कालावधीत करण्यात येणार आहे. सदर वेळी ठाणे घोडबंदर वाहिनीवर ठराविक ठिकाणी जड अवजड वाहनांच्या वाहतुकिसाठी मुख्य रस्ता बंद करावा लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद –** **१)** ठाणे घोडबंदर वाहिनीवरील गायमुख स्टेशनचे I & U Grider चे काम करताना घोडबंदरच्या दिशेने जाणाऱ्या सर्व जड अवजड वाहनांना **पिलर नं. ८५ जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** ठाणे घोडबंदर वाहिनीवर गायमुख स्टेशनचे I & U Grider चे काम करताना सर्व जड अवजड वाहने पिलर नं. ८५ जवळून विरूध्द दिशेने घोडबंदर ठाणे मुख्य मार्गावरून पुढे जाऊन पुढे पिलर नं. १०२ येथून डावे बाजुस वळण घेवुन पुढे इंडियन ऑईल पंपसमोर मुख्य रस्त्यामार्गे इच्छित स्थळी जातील.

**ब)** घोडबंदर ठाणे वाहिनीवर गायमुख स्टेशनचे I & U Grider चे काम करताना सर्व प्रकारची हलकी वाहने पिलर नं. ८५ जवळून सर्व्हिस रोडने जाऊन पुढे इंडियन ऑईल पंपसमोर मुख्य रस्त्याने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **२)** घोडबंदर ठाणे वाहिनीवर गर्डरचे काम करताना ठाणेच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **नागला बंदर व आशा वाईन शॉप जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** घोडबंदर ठाणे वाहिनीवर नागला बंदर पुढे I & U Grider चे काम करताना सर्व प्रकारच्या वाहनांना नागला बंदर डिपी ७२, ७३ व आशा वाईन शॉप येथुन सर्व्हिस रोडने जावून लोढा स्प्लेन्ड्रा येथे घोडबंदर ठाणे वाहीनी मुख्य मार्गावरुन इच्छीत स्थळी जातील.

**सदर वाहतूक अधिसूचना दिनांक १६/०७/२०२५ रोजी ते दिनांक ०८/०८/२०२५ रोजी रात्रौ २३:०० वा. ते सकाळी ०४:०० वा. पावेतो T & L precast, I & U Grider टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.**

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर :–

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

CamScanner

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–


प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

<u>प्रत</u> :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner




J-KUMAR
MUMBAI METRO LINE 4A

NOTE:- This traffic diversion plan is consider for both (LHS & RHS) T & L & U & PI & I- Girder erection work